# प्रकरण तीन

## संशोधनसमस्येशी संबंधित साहित्याचे समालोचन

३.१ प्रास्ताविक

३.२ संशोधनसमस्येशी संबंधित साहित्याचे समालोचन

३.२.अ) संशोधनसमस्येशी संबंधित ग्रंथस्वरूपातील व लेखस्वरूपातील प्रकाशित झालेल्या साहित्याचे समालोचन

३.२.ब) संशोधन समस्येशी संबंधित असलेल्या संशोधित साहित्याचे समालोचन

३.३ समारोप.

## ३.१ प्रास्ताविक :

संशोधकाने संशोधनसमस्येशी निगडित विषयावर पूर्वी कोणी संशोधन केले आहे काय याचा शोध घेऊन त्या संशोधनाचा अभ्यास केला पाहिजे. संशोधन समस्येशी निगडित साहित्याच्या समालोचनाची गरज Whitney यांनी आपल्या 'The Elements of Research' या ग्रंथात खालीलप्रमाणे विशद केली आहे.

"The review of the literature promotes a greater understanding of the problem and its crucial aspects and ensures the avoidance of unnecessary duplication. It also provides comparative data on the basis of which to evaluate and interprete the significance of one's findings. In addition, it contributes to the scholarship of the investigator.....No experienced researcher would think of undertaking a study without acquainting himself with the contribution of previous investigators."[1]

संशोधित साहित्याच्या समालोचनाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे सांगता येतील :

निवडलेला विषय हा जुन्या संशोधनातून शिल्लक राहिलेला किंवा त्या संशोधकाने सुचविलेला पुरवणी विषय आहे का ते पाहाता येणे.

योग्य संशोधन विषय निवडण्यास मार्गदर्शन मिळविणे.

निवडलेल्या विषयासंबंधी पूर्वी झालेल्या संशोधनाची कल्पना प्राप्त करून त्याची पुनरावृत्ती टाळणे.

निवडलेल्या विषयासंबंधी आवश्यक योग्य पध्दती, तंत्र यांच्याबद्दल माहिती मिळविणे.

संशोधन विषयासंबंधी सिध्दांत व गृहितकृत्य यांच्या मांडणीबद्दल निश्चित कल्पना प्राप्त करुन देणे.

आधार सामग्री व निष्कर्ष याविषयी तुलनात्मक माहिती मिळविणे.

समर्पक सांख्यिकी तंत्र व त्याचा उपयोग आणि निर्वचन करण्यासाठी मार्गदर्शन प्राप्त करणे.

संदर्भ साहित्याचा अभ्यास करुन स्वत:ची ज्ञानवृध्दी वाढविणे.

## ३.२ संशोधन समस्येशी निगडित साहित्याचे समालोचन :

संशोधन समस्येशी निगडित साहित्य दोन प्रकारचे आहे :

१) ग्रंथस्वरुपात प्रकाशित झालेले माहितीवजा व सैध्दान्तिक स्वरुपाचे साहित्य.

२) संशोधन पदवीसाठी विविध विद्यापीठांतून सादर केलेले शोधप्रबंधाच्या स्वरुपातील साहित्य.

प्रस्तुत प्रकरणाच्या पूर्वभागात ग्रंथस्वरुपात व लेखस्वरुपात प्रकाशित झालेल्या साहित्याचे अत्यंत थोडक्यात समालोचन केलेले आहे.

### ३.२.अ) संशोधन समस्येशी संबंधित ग्रंथस्वरुपातील व लेखस्वरुपात प्रकाशित झालेल्या साहित्याचे समालोचन -

सिमला येथील अखिल भारतीय स्तरावर झालेली नैतिक शिक्षण-विषयक परिषद व औरंगाबाद येथे झालेल्या राज्यस्तरीय नैतिक शिक्षण-विषयक चर्चासत्रातील शिफारशीनुसार लिहिली गेलेली व संचालक,

शिक्षणशास्त्र संस्था, पुणे यांनी प्रकाशित केलेली `नैतिक शिक्षण`[२] ही पुस्तिका मूल्यशिक्षणाच्या संदर्भातील एक अतिशय महत्वपूर्ण पुस्तिका आहे. या पुस्तिकेत नैतिक शिक्षणाची संकल्पना, उद्दिष्टे, पार्श्वभूमी, सामाजिक संदर्भ, मानसशास्त्रीय अधिष्ठान, मूल्यांच्या कार्यात्मक व्याख्या, अपेक्षित वर्तन बदल, संस्कार संवर्धनाचे मूल्यमापन इत्यादी बाबतीत मार्गदर्शन केलेले आहे. शिक्षकांना मूल्यशिक्षणाबाबत मार्गदर्शनपर अशी ही पुस्तिका आहे.

श्री. ल.नी. छापेकर यांचे `असे होतात संस्कार`[३] हे पुस्तक मूल्यशिक्षण संदर्भातील एक महत्वपूर्ण पुस्तक आहे. मूल्यसंक्रमणाच्या संदर्भात जाणीवपूर्वक काम केलेल्या मुख्याध्यापकाने आपले अनुभव या पुस्तकात सांगितले आहेत. मूल्यसंक्रमण करताना शिक्षकाने घ्यावयाची दक्षता, विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाची बूज राखून त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील त्रुटी कशा नाहीशा कराव्यात, पालकांचे सहकार्य कसे मिळवावे व त्यांचे उद्बोधन कसे करावे याची माहिती या अनुभवातून मिळते. मूल्यशिक्षणावर लिहिलेले हे पुस्तक मुख्याध्यापक, शिक्षक, पालक व विद्यार्थी यांना उपयुक्त आहे.

प्रा. अ.स. जोशी यांचे `नैतिक अध्यात्मिक शिक्षण`[४] हे पुस्तक एकप्रकारचे प्रकट चिंतन आहे. शिक्षणाद्वारे बालतरुणांचा सात्विक गुणोत्कर्ष व्हावा म्हणून सर्वांना एकत्रित येण्यासाठी केलेले विनम्र आवाहन आहे.

या ग्रंथामध्ये लेखकाने नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाची सांगड आधुनिक शिक्षणाशी कशी घालावी याचा अत्यंत तर्कशुध्द व मुद्देसूद विचार केलेला आहे. यात अतिप्राचीन कालापासून ते अर्वाचीन कालापर्यन्त नैतिक शिक्षणाचा विकास कसकसा होत गेला ते पहावयास मिळते.

प्रा. दि.ह. सहस्त्रबुध्दे यांचा ` शिक्षणातून नैतिक मूल्यसंवर्धन `[5] हा ग्रंथही मूल्यशिक्षणाच्या संदर्भात महत्वपूर्ण असा ग्रंथ आहे. समाज-जीवनातील सहा दोषांचे विश्लेषण करून नैतिक शिक्षणाद्वारे समाज दोषमुक्त कसा करता येईल याचा शोध त्यांनी या पुस्तकात घेतलेला आहे. मूल्यसंवर्धनात शिक्षकाची भूमिका, शालेय दैनंदिन उपक्रमांतून, शालेय वातावरणातून, पाठ अध्यापनातून मूल्यसंवर्धन कसे करता येईल या संदर्भात मार्गदर्शनपर असे हे पुस्तक आहे.

श्री. म.द. नाडकर्णी यांचे ` शिक्षणाच्या वास्तव दिशा `[6] हे पुस्तक महाविद्यालयीन स्तरावर मूल्यशिक्षणाच्या उपक्रमांचे आयोजन कसे करावे या विषयाचे अनुभव कथन आहे. लेखकाने आपल्या महाविद्यालयात उपक्रमांमधून राखलेले सातत्य, त्या मागील निष्ठा अनुकरणीय आहे.

प्रा. रा.तु. भगत यांनी संपादित केलेले ` आजच्या शिक्षणा-तील विचारप्रवाह `[7] हे पुस्तक मान्यवरांचे मूल्यशिक्षणविषयक विचार जाणून घेण्यास उपयुक्त आहे. ` शिक्षण : स्वभाव सुधारण्याचे ज्ञान ` या डॉ. ग.श्री. खैर यांच्या लेखातून व्यक्तीच्या वाणीतून आणि कृतीतून सदाचार व्यक्त व्हावा आणि व्यक्ती सदाचारी बनून तिचे आणि संपूर्ण समाजाचे जीवन मंगलमय व्हावे या संदर्भातील विचार त्यांनी मांडलेले आहेत. वि.वि. चिपळूणकरांच्या ` शिक्षणाचे पंचप्राण ` हा लेख, प्रेमाने प्रेम वाढवू या, यशाने यश मिळवू या, विश्वासाने विश्वास वाढवू या, संपर्कातून संपर्क वाढवू या, स्वयंमूल्यमापनातून स्वयंविकासाप्रत जाऊ या. या शिक्षण पंचसूत्रीचे विश्लेषण करणारा आहे.

` शिक्षण आणि संस्कार ` हा यदुनाथ थत्ते यांचा लेख संस्काराचे श्र स्वरूप जाणून घेण्यासाठी उपयुक्त आहे. ` नैतिक शिक्षण ` हा गो.के. मानापावकर यांचा लेखही विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण

होत असताना योग्य त्या अभिवृत्ती विद्यार्थ्यांत कशा जोपासाव्यात याचे मार्गदर्शन करणारा आहे. ` आचार्य कुल : एक शाश्वत शैक्षणिक विचार ` हा प्र.द. पुराणिक यांचा लेख विनोबाजींच्या ` आचार्य कुल ` कल्पनेचे अधिक स्पष्टीकरण करणारा आहे.

डॉ. रा.मा. देवस्थळी यांचा ` विद्यार्थी मित्रांनी `[८] हा ग्रंथ त्यांनी शिक्षणशास्त्र विषयातील विविध विषयांवर दिलेल्या भाषणांचे संकलन आहे. या ग्रंथातील ` मूल्यांचे मानवी जीवनातील स्थान ` हे भाषण मूल्यशिक्षणाची गरज लक्षात आणून देते तसेच मानवी जीवनातील मूल्यांचे महत्व विशद करते. मूल्यस्वभावाबद्दलची भूमिका स्पष्ट होण्याच्या दृष्टीने हे भाषण अत्यंत महत्वाचे आहे.

माजी शिक्षणमंत्री मधुकरराव चौधरी यांच्या निवडक भाषणांचा संग्रह म्हणजे ` शिक्षण विचार `[९] हा ग्रंथ होय. विविध शैक्षणिक विषयावरील भाषणे त्यात आहेत. प्रस्तुत ग्रंथातील १७ वा लेख नैतिक शिक्षण यातून स्वातंत्र्योत्तर काळातील मूल्यशिक्षणाची गरज स्पष्ट करून त्याबाबत श्री. प्रकाश समिती (१९५९), विद्यापीठ शिक्षण मंडळ (१९४८-४९) व कोठारी आयोग (१९६४-६६) यांनी मूल्यशिक्षणाच्या बाबतीत वेळोवेळी केलेल्या शिफारशी व त्यांची अंमलबजावणी याबाबत आढावा घेतलेला आहे.

श्रीमती महाराणी ताराबाई अध्यापक महाविद्यालय, कोल्हापूर या संस्थेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त संस्थेच्या प्राचार्यांनी संपादित करून प्रकाशित केलेला ` मूल्यशिक्षण `[१०] विशेषांकही मूल्यशिक्षणाच्या संदर्भात महत्वाचा आहे. पाठ्यपुस्तकातील मूल्यांचा शोध कसा घ्यावा, ती विद्यार्थ्यांवर कशी ठसवावीत, मूल्यशिक्षणाच्या दृष्टिकोनातून पाठनियोजन कसे करावे याचे मार्गदर्शनही या विशेषांकात आहे.

प्रा. शरद शंकर कुलकर्णी यांचे ` उद्याचे शिक्षण - शिक्षकांशी हितगुज `[११] या पत्रक्रमाने लिहिलेल्या पुस्तकात विविध शैक्षणिक विषयांवरचे लेख आहेत. प्रत्येक पत्रात एका शैक्षणिक समस्येवर लिखाण केलेले आढळते. पत्रशैलीतील लिखाणामुळे लेखन आकर्षक वाटते. पत्र क्रमांक ३ - ` नीतिशिक्षण आणि मूल्यविवेक ` या लेखात मूल्य-विकसनाचे टप्पे, निरनिराळ्या मूल्यांची जाणीव कशी करून देता येईल, इत्यादी बाबतीत खुमासदार शैलीत वर्णन केलेले आहे.

संपादक, प्रकाशक शि.द. रेगे यांनी प्रकाशित केलेल्या ` शैक्षणिक विचार दर्शन `[१२] या पुस्तकात अनेक मान्यवरांचे लेख आहेत. त्यातील प्राचार्य, डॉ. मा.के. सोहोनी यांचा ` वर्तनपातळी आणि नैतिकशिक्षण ` या लेखात बदलत्या व अनिष्ट दिशेने जाणाऱ्या वर्तन पातळीची कारणे, मूल्यविकसनाचा क्रम, नैतिक शिक्षणाचे साध्य, नैतिक शिक्षण कसे देता येईल इत्यादी विषयांचा ऊहापोह केलेला आहे. याच पुस्तकात श्री.स.उर्फ दादा महाजन यांचा ` नैतिक व धार्मिक शिक्षण आणि देशभक्ती ` हाही लेख मूल्यशिक्षणावर प्रकाश टाकणारा आहे.

बी.आर. गोयल यानी एन.सी.ई.आर.टी., नवी दिल्ली येथून प्रकाशित केलेले "Documents on Social, Moral and Spiritual Values in Education"[१३] हे पुस्तक विविध शैक्षणिक आयोग आणि शिक्षण मंडळे यांच्या नैतिक शिक्षणाच्या संदर्भातील शिफारशींचा आढावा घेणारे आहे. यात ८४ मूल्यांची यादी दिलेली आहे.

दि.ह. सहस्त्रबुद्धे यांचा ` शिक्षण आणि समाज ` (एप्रिल-जून १९८४) या त्रैमासिकातून प्रकाशित झालेला ` पाठ अध्यापनातून मूल्यसंवर्धन `[१४] या लेखात अध्यापनातून मूल्यसंस्कार कसे करता येतील याबद्दल सोदाहरण मार्गदर्शन केलेले आहे.

श्री. ग.शं. डोंगरे यांच्या ` नैतिक शिक्षणाचा प्रकल्प - संकल्पना व कार्यवाही `[१५] या ` शिक्षण आणि समाज ` एप्रिल-जून १९८४ मध्ये प्रकाशित झालेल्या लेखात गेल्या शंभर वर्षातील नैतिक शिक्षणाच्या विचारांचा ऐतिहासिक आढावा घेतलेला आहे. त्याचे प्रामुख्याने तीन कालखंड पडतात - मध्ययुगीन काळ, ब्रिटिश कालखंड व स्वातंत्र्योत्तर कालखंड. स्वातंत्र्योत्तर कालखंडात विद्यापीठ शिक्षण आयोग (१९४८-४९), माध्यमिक शिक्षण आयोग (१९५४-५५) शिक्षण आयोग (१९६४-६६) आयोगांनी नैतिक शिक्षणाच्या संदर्भात केलेल्या शिफारशींचा आढावा घेतलेला आहे.

श्री. मे.पु. रेगे यांचा ` मूल्यांचे शिक्षण `[१६] हा ` शिक्षण आणि समाज,` जुलै-सप्टेंबर १९८१ मध्ये प्रकाशित झालेला अतिशय उद्बोधक असा लेख आहे. यात शिक्षणाचा आशय, मूल्यांचे जीवनातील महत्व, मूल्यांचे स्वरूप व प्रकार, मूल्यशिक्षणाचा बौध्दिक आशय, आदि बाबतीत मार्गदर्शन केलेले आहे. श्री. अ.वि. गाडगीळ यांच्या ` मूल्य शिक्षण `[१७] या `शिक्षण आणि समाज,` जानेवारी-मार्च, १९८५ मध्ये प्रकाशित झालेल्या लेखात श्रीमती त महाराणी ताराबाई अध्यापक महाविद्यालय, कोल्हापूर ` या शासकीय संस्थेने सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त प्रकाशित केलेल्या क्रमांक १ च्या ` मूल्यशिक्षण ` या पुस्तिकेचे परीक्षण केलेले आहे.

श्री. दि.कृ. गोटखिंडीकर यांचा ` नैतिक शिक्षणाविषयी माझ्या कल्पना `[१८] हा लेख ` भारतीय शिक्षण,` मे-जून १९८६ मध्ये प्रकाशित झाला आहे. यात नैतिक शिक्षणाची आवश्यकता,उद्दिष्टे, व्यवस्थापन व पध्दती इत्यादींविषयी विचार प्रगट केलेले आहेत.

श्री. ल.ह. रानडे यांचा ` शाश्वत मूल्यांची जोपासना `[१९] हा ` भारतीय शिक्षण ` ऑगस्ट, १९८२ मध्ये प्रकाशित झालेला लेख आजची सामाजिक स्थिती, मूल्यांचा ऱ्हास, मूल्यशिक्षणात शिक्षकाची भूमिका व जबाबदारी इत्यादी बाबींवर प्रकाश टाकतो.

श्री. आर.पी. पोतदार यांचा `नैतिक शिक्षण - काल, आज आणि उद्या `२० हा `भारतीय शिक्षण,` ऑगस्ट १९८४ मध्ये प्रकाशित झालेला लेख प्राचीन भारतातील नैतिक शिक्षण, आजचे शिक्षण, नैतिक शिक्षणाची गरज व नैतिक शिक्षणातील शिक्षकांचे कर्तव्य इत्यादी मुद्यांचा परामर्श घेणारा आहे.

डेहराडून येथील डी.ए.व्ही. कॉलेजमध्ये १ ते २८ जून, १९८८ या कालावधीत महाविद्यालयीन व विद्यापीठीय पातळीवर मूल्यशिक्षण अध्यापन पध्दती व तंत्र या संदर्भात घेण्यात आलेल्या कृतिसत्रात वाचले गेलेले निबंधही या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. निबंधलेखक आणि निबंधशीर्षक पुढीलप्रमाणे :

1) Dr. Ahluwalia, S.P.
   Inculcating Values among Students, Teachers, some suggestions.

2) Dr. Atrey J.P.
   Values and Their Educational Significance.

3) Dr. Dewasthalee, R.B.
   1. Existential significance of value system in Human life.
   2. The content of value Education in a Pluralistic Society.

4) Dr.Kulshrestha S.P.
   1. Value through ages.
   2. Values and some allied terms.
   3. Value clarification strategies.
   4. Philosophical, Psychological and Sociological concept of values

5) Dr. Mathur S.S.
   Development of Value Education in India.

6) Dr. Rahinwala D.N.
   1. Traditional Method of Teaching of values
   2. Value clarification strategies.

7) Dr. Sing Ajit,
   Inculcating Values search for Strategies.

8) Dr. Visvesvaran H.
   1. Inclucation of values.
   2. Value Oriented Education

(Papers presented in the All India Workshop on Method and Techniques of Teaching Values at College and University level at D.A.V. (P.G.) College, Dehradun, June 1 to 28, 1988).

या सर्व ग्रंथांचे व मूल्यांचे संदर्भात प्रकाशित झालेल्या लेखांचे समालोचन केले असता एक गोष्ट लक्षात येते की, ११ वी व १२ वी च्या (उच्च माध्यमिक स्तरावरील) प्रथमभाषा मराठीच्या पाठ्यपुस्तकांतून प्रतिबिंबित झालेल्या मूल्यांचे विद्यार्थ्यांमध्ये संक्रमण कसे करायचे, त्या मागील अडचणी कोणत्या या संदर्भात अद्यापि संशोधन झालेले नाही. सबब प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेला हा विषय मूलगामी आणि नवीन असा आहे.

३.२.ब) संशोधन समस्येशी संबंधित असलेल्या
<u>संशोधित साहित्याचे समालोचन :</u>

वरील परिच्छेदांतून ग्रंथक्रमाने तसेच लेखक्रमाने प्रकाशित झालेल्या साहित्याचे समालोचन केले. पुढील परिच्छेदांतून संशोधन समस्येशी संबंधित असलेल्या संशोधित साहित्याचे समालोचन केलेले आहे.

प्रस्तुत विषयाशी संबंधित संशोधनाच्या अभ्यासाचा शोध घेण्यासाठी संशोधिकेने पुढील ग्रंथांचे अवलोकन केले :

१) दि थर्ड इंडियन इयर बुक ऑफ एज्युकेशनल रिसर्च, एन.सी.ई.आर.टी., न्यू दिल्ली, १९६९.

२) दि सर्वे ऑफ रिसर्च इन एज्युकेशन, संपादन डॉ. एम.बुच, सेंटर ऑफ ए अॅडव्हान्स स्टडी इन एज्युकेशन, दि एम.एस. युनिव्हर्सिटी, बरोडा, १९७४.

३) एज्युकेशन इनव्हेस्टीगेशन इन इंडियन युनिव्हर्सिटीज (१९३९-१९६१), एन.सी.ई.आर.टी., न्यू दिल्ली, १९६९.

४) एज्युकेशन इनव्हेस्टीगेशन इन युनिव्हर्सिटीज इन महाराष्ट्र, (१९३९-१९७०), स्टेट इन्स्टिटयुट ऑफ एज्युकेशन, पुणे-३०

५) दि सेकंड सर्व्हे ऑफ रिसर्च इन एज्युकेशन (१९७२-१९७८), संपादक डॉ.एम.बी. बुच, सोसायटी फॉर एज्युकेशनल रिसर्च अॅन्ड डेव्हलपमेंट, बरोडा, १९७९.

६) एज्युकेशनल रिचर्स इन दि युनिव्हर्सिटी ऑफ बॉम्बे, संपादिका डॉ.(सौ.) प्रतिमा देव, डिपार्टमेंट ऑफ एज्युकेशन, युनिव्हर्सिटी ऑफ बॉम्बे, १९८१.

७) एज्युकेशनल रिसर्च इन युनिव्हर्सिटीज इन महाराष्ट्र, प्लॅटिनम ज्युबिली इयर व्हाल्युम, संपादक डॉ. एन.के. पाटोळे, एस.टी. कॉलेज, मुंबई, १९८३.

८) भाषा व साहित्य : संशोधन (आवृत्ती, १९८१), संपादक डॉ. वसंत स. जोशी, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे-३०.

९) अॅबस्ट्रॅक्टस् ऑफ डॉक्टरल रिसर्चेस् इन एज्युकेशन, संपादक डॉ. एस.बी. पांडे, डॉ. एम.बी. कुंडले (नागपूर : सेक्रेटरी, शिक्षण समीक्षा मंडळ, १९८७)

वरील ग्रंथाव्यतिरिक्त महाराष्ट्रराज्य संशोधन व प्रशिक्षण परिषद यांच्या वतीने प्रसिध्द होणारे ` रिसर्च बुलेटिन ` या त्रैमासिकाचे सर्व अंक त्याचप्रमाणे असोशिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज यांच्या वतीने प्रकाशित होणाऱ्या ` युनिव्हर्सिटी न्यूज ` या साप्ताहिकातील ` थिसिस

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

ऑफ द मंथ ' या सदराखाली प्रसिध्द होणाऱ्या विद्यापीठांनी स्वीकृत केलेल्या प्रबंधांची नावे चाळली.

वरील ग्रंथांचे काळजीपूर्वक स अवलोकन करून प्रस्तुत संशोधनाशी संबंधित जे संशोधन झालेले आहे त्याचा आढावा पुढील परिच्छेदातून घेतलेला आहे.

Hsanul Hag (1973)[21] यांनी भारतीय राज्यघटनेत नोंद झालेली आधुनिक राजकीय मूल्ये आणि शाळेतील क्रमिक पुस्तकातील पाठ्यांशांमधून बिंबविण्याची मूल्ये यांच्या संबंधाचा अभ्यास केलेला आहे. यासाठी त्यांनी दिल्लीतील शाळांमधील विशेषत: हिंदी, इंग्रजी, इतिहास, नागरिकशास्त्र या क्रमिक पुस्तकांच्या पाठ्यांशांचे वर्गीकरण, विश्लेषण केलेले आहे. त्यांना मिळालेले निष्कर्ष खालील प्रमाणे :

क्रमिक पुस्तकातील मूल्यांचे सादरीकरणामध्ये विशिष्ट असा साचा ( Pattern ) किंवा सातत्य ( Consistency ) राखले गेलेले नाही.

मूल्यांचे स्वरूप आणि विद्यार्थ्यांची मानसिक परिपूर्णता (क्षमता) यांच्यामधील संबंध योग्य नाहीत.

विद्यार्थ्यांच्या वर्गांमध्ये समान वयोगटाच्या व मानसिक पातळीच्या बाबतीत सारखेपणा राखला गेलेला नाही.

प्राथमिक स्तरावरील भाषेची पुस्तके काही अंशी मूल्ये संक्रमित करण्यास उपयुक्त ठरतील असे वाटते पण ९ वी, १० वी व ११ वीची क्रमिक पुस्तके पूर्णांशाने वाड्.मयीन ( Literary ) दृष्टिकोनातून लिहिली गेलेली आहेत.

ज्या पुस्तकांतून राजकीय मूल्ये संक्रमित करायचीत अशी आपण अपेक्षा करतो त्या नागरिकशास्त्राच्या पुस्तकांतूनही मूल्यांच्या संदर्भात जाणीवपूर्वक व सातत्यपूर्ण प्रयत्न केले गेलेले नाहीत.

मानसिक परिपूर्णतेच्या (क्षमतेच्या) तत्वानुसार पहिली ते अकरावीच्या निरनिराळ्या क्रमिक पुस्तकांतून निरनिराळ्या राजकीय मूल्यांवर अधिक भर दिला गेलेला नाही.

शिक्षणाच्या समाजशास्त्राचा क्षेत्रीय अभ्यास करीत असताना श्री. गोरे (१९७०)[२२] यांनी जे संशोधन केले आहे त्याचा निष्कर्ष पुढे दिला आहे.

राष्ट्रीय संस्कृतीची प्रतिके म्हणून आपण क्रमिक पुस्तकांकडे पाहू शकतो. इतर कोणत्याही साधनांपेक्षा राष्ट्रीय उद्दिष्टे व मूल्ये रुजविण्यासाठी क्रमिक पुस्तके ही महत्वाची साधने आहेत. भारतातील सामाजिक तत्वप्रणालीमध्ये जर उदारमतवादी लोकशाही व शास्त्रीय तंत्रज्ञान ही जर मूल्यांची महत्वाची उगमस्त्रोत्रे गृहित धरली तर शिक्षणपध्दतीनेही आपल्या कृतीतून आणि पध्दतीतून बुध्दिनिष्ठ आणि ईहवादी लोकशाही समाज अपेक्षिला असेल तर बुध्दिनिष्ठ ईहवाद व समता यांना शिक्षणप्रक्रियेमध्ये देखील योग्य स्थान मिळाले पाहिजे. त्यांना क्रमिक पुस्तकांतून व अवांतर वाचनासाठी असलेल्या पुस्तकांतून योग्य स्थान दिले गेले पाहिजे.

प्रा. यु.एस. चौधरी, व प्रा. बी.ए. शर्मा (१९७४)[२३] यांनी एन.सी.ई.आर.टी.ने तयार केलेली राष्ट्रीय पातळीवरील पहिली ते आठवीची हिंदीची क्रमिक पुस्तके व मध्यप्रदेश क्रमिक पुस्तक मंडळाने तयार केलेली १ ली ते ८ वीची हिंदी पुस्तके यांचा पुस्तकांतून प्रतिबिंबित होणाऱ्या मूल्यांच्या संदर्भात तुलनात्मक अभ्यास केलेला आहे. हे संशोधन त्यांनी एम.एड्. साठी शोधप्रबंध म्हणून इंदोर विद्यापीठामध्ये सादर केले आहे.

संशोधनातून त्यांना मिळालेले निष्कर्ष पुढे दिले आहेत :

एन.सी.ई.आर.टी. च्या क्रमिक पुस्तकातून ' शौर्य ' आणि ' साहस ' या मूल्यांवर सर्वाधिक भर दिलेला आहे.

मध्यप्रदेश क्रमिक पुस्तक मंडळाच्या क्रमिक पुस्तकांमध्ये ' देशप्रेम ' या मूल्यावर अधिक भर देण्यात आलेला आहे.

एन.सी.ई.आर.टी. व मध्यप्रदेश क्रमिक पुस्तकांमधून मूल्यांच्या सादरीकरणामध्ये बरेच साम्य आहे. एन.सी.ई.आर.टी. च्या क्रमिक पुस्तकांमधून त्याग, परमेश्वरावरील श्रध्दा, आज्ञाधारकपणा, या मूल्यांवर कमी भर दिलेला आहे तर मध्यप्रदेश क्रमिक पुस्तक मंडळाच्या पुस्तकांमध्ये सहकार्य व करुणा या मूल्यांवर कमी भर दिलेला आढळून येतो.

प्रा. चौधरी यु.एस. यांनी मध्यप्रदेशातील इ. १ ली ते ८ वीच्या राष्ट्रीय ( Nationalized ) हिंदी क्रमिक पुस्तकांचे मूल्यमापन केलेले आहे. हे संशोधन त्यांनी इंदौर विद्यापीठामध्ये ' वाचस्पती ' ( Ph.D. ) पदवीसाठी सादर केलेले आहे (१९७५).[२४] त्यांना संशोधनातून मिळालेले निष्कर्ष खालील प्रमाणे :

' देशभक्ती ' या मूल्याला क्रमिक पुस्तकामध्ये अधिक महत्व दिलेले असून ' शास्त्रीय दृष्टिकोन ' या मूल्याला अल्प महत्व दिलेले आहे.

करुणा, सततोद्योग, धैर्य आणि प्रेम या मूल्यांना १ ली ते ४ थीच्या क्रमिक पुस्तकांतून जास्त महत्व दिलेले असून ५ वी ते ८ वीच्या क्रमिक पुस्तकातून प्रेम, करुणा, धैर्य आणि समानता यांना अधिक महत्व दिलेले आहे.

इ. पहिली ते चौथीच्या क्रमिक पुस्तकांतून समानता, सत्य, विनम्रता, अहिंसा, त्याग आणि स्वातंत्र्य यांना सर्वसाधारणत: सारखेच महत्व दिलेले आहे तर इ. ५ वी ते ८ वीच्या क्रमिक पुस्तकांतून सहकार्य,

विनम्रता, त्याग, निधर्मीपणा, आंतरराष्ट्रीय सामंजस्य यांना सर्वसाधारणत: सारखेच महत्व दिलेले आहे.

इ. १ ली ते ५ वीच्या क्रमिक पुस्तकातून आरोग्य, शास्त्रीय दृष्टिकोन, न्याय, आंतरराष्ट्रीय सामंजस्य व साधी रहाणी यांना अल्प महत्त्व दिलेले आहे.

इ. ५ वी ते ८ वीच्या क्रमिक पुस्तकातून शास्त्रीय दृष्टिकोन, न्याय, साधी रहाणी, अहिंसा, कर्तव्यजाणीव यांना अल्प महत्त्व दिलेले आहे.

पाठयपुस्तकांमधील मूल्यांच्या सादरीकरणात विशिष्ट असा साचा किंवा सातत्य नाही.

Keasey (1971)[25] ने असा निष्कर्ष काढला की, सामाजिक कार्यामधील सहभाग हा व्यक्तीच्या नैतिक विकासाचा परिपाक आहे. जितका नैतिक विकास अधिक असेल तितक्याच अधिक प्रमाणात त्या व्यक्तीचा सामाजिक कार्यांमध्ये अधिक सहभाग असेल.

Moir (1974)[26] च्या मते नैतिक विकास व्यक्तीच्या अंगी विविध जबाबदाऱ्या पार पाडण्याचे सामर्थ्य निर्माण करत असते.

Ries (1981)[27] यांच्या संशोधनाचा मुख्य उद्देश हा होता की, विशिष्ट शैक्षणिक अभ्यासक्रमाचा नैतिक विकास साधण्याच्या दृष्टीने कसा उपयोग करता येईल.

Garrold (1982)[28] च्या प्रबंधामध्ये उच्च माध्यमिक पातळी-वरील इंग्रजीचा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांमधील नैतिक विकास घडवून आणण्यास कितपत साहाय्यभूत होईल याचा विचार करण्यात आलेला आहे.

Harvey Patricia Lawson (1983)[29] ने विद्यार्थ्यांचा विविध उपक्रमातील सहभाग आणि त्या उपक्रमांबद्दल त्यांचे विचार यांची त्यांच्या नैतिक विकासाशी सांगड घालण्याचा प्रयत्न केलेला आहे.

Bailey (1985)[30] यांनी प्राथमिक शिक्षकांची वर्गाध्यापनाचेवेळी सहनशीलता (विशेषत: गैरवर्तणूक करणाऱ्या मुलांना अध्यापन करताना) आणि अशा विद्यार्थ्यांच्या नैतिक विकासासंबंधी संबंधित शिक्षकांचे अंदाज यांचा विचार केलेला आहे. त्यांनी असे प्रतिपादन केले की सहनशीलतेची पातळी आणि स्वरूप हे त्या त्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या नैतिक विकासाच्या पातळीवर अवलंबून असते.

प्रा. बन्सी पंडित (१९८६)[३१] यांनी ` नैतिक शिक्षणाबाबत माध्यमिक शिक्षकांची मते आजमावणे ` या विषयावर संशोधन केले आहे.

संशोधनाचा प्रमुख उद्देश खालील प्रश्नासंबंधी माध्यमिक शिक्षकांची मते आजमाविणे :

१) आजच्या भारतीय समाजात नैतिक मूल्यांचे अवमूल्यन झाले आहे काय ?
२) नैतिक मूल्यांच्या अवमूल्यनासाठी भारतीय समाजातील कोणते घटक जबाबदार आहेत ?
३) आजची शिक्षणपध्दती तरुण पिढीस नैतिक मूल्यांची जोपासना करण्यात असमर्थ ठरली आहे काय ?
४) शैक्षणिक क्षेत्रातील नैतिक अवमूल्यनास जबाबदार असलेले घटक कोणते ?
५) नैतिक शिक्षणाची सुरुवात कोणापासून करावी ?
६) नैतिक शिक्षणाची उद्दिष्टे काय असावीत ?

७) नैतिक मूल्यांच्या जोपासनेसाठी महत्वाचे मार्ग कोणते ?

८) वेळापत्रकात नैतिक शिक्षणासाठी वेगळा तास असावा काय ?

९) नैतिक शिक्षणासाठी वेगळे प्रशिक्षित शिक्षक असावेत काय ?

१०) केवळा शाळांमधून नैतिक शिक्षणाची सोय करून नैतिक मूल्यांचा विकास व जोपासना करणे शक्य आहे काय ?

प्रस्तुत अभ्यासासाठी धुळे तालुक्यातील एकूण २०० शहरी व माध्यमिक शाळांपैकी ७५ शाळा व त्यातील एकूण २६० शिक्षकांची निवड यादृच्छिक पध्दतीने केली. यापैकी आठ शिक्षकांची मतप्रश्नावली अपूर्ण असल्यामुळे त्यांचा समावेश प्रस्तुत अभ्यासात केला नाही. म्हणून प्रस्तुत अभ्यासात २५२ माध्यमिक शिक्षकांचा समावेश केला गेला.

संशोधन समस्येविषयीची माध्यमिक शिक्षकांची मते आजमाविण्यासाठी संशोधकाने एक प्रश्नावली तयार केली. ही प्रश्नावली तयार करताना नैतिक शिक्षणासंबंधीचे सैध्दांतिक विवेचन करणारे ग्रंथ व शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील पाच प्राध्यापकांची मते विचारात घेतली.

प्रश्नावलीद्वारा मिळालेल्या सामग्रीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यासाठी काय-स्क्वेअर परीक्षिकेचा उपयोग केला. प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष खालीलप्रमाणे :

आजच्या भारतीय समाजात नैतिक मूल्यांचे अवमूल्यन झाले असून प्रचलित शिक्षण पध्दती तरुण पिढीत नैतिक मूल्यांची जोपासना करण्यात असमर्थ ठरली आहे.

यासाठी केवळ प्रचलित शिक्षण पध्दतीत मूल्यशिक्षणाची व्यवस्था करून भागणार नाही. तर समाजातील नैतिक अवमूल्यनास जबाबदार असलेल्या

घटकांना सत्ताधारी वर्ग, पालक वर्ग व बुद्धिवादी वर्ग - नैतिक शिक्षणाचे धडे विद्यार्थ्यांच्या अगोदर देणे आवश्यक आहे.

तसेच शैक्षणिक क्षेत्रातील नैतिक अवमूल्यनास कारणीभूत असलेल्या प्रमुख कारणांना अयोग्य शिक्षकांची नियुक्ती, पुढाऱ्यांचा शिक्षणात हस्तक्षेप व व्यावसायिक जीवनात प्रमाणपत्राचे अवास्तव महत्व - पायबंद घालण्याच्या दृष्टीने योग्य ती कार्यवाही गंभीरपणे करण्याची आवश्यकता आहे.

नैतिक शिक्षणासाठी वेळापत्रकात स्वतंत्र तास व खास प्रशिक्षित शिक्षक नसावेत.

विद्यार्थ्यांमध्ये सारासार विचार करण्याची क्षमता निर्माण करणे, विद्यार्थ्यांना नैतिक मूल्यांची ओळख करून देणे व संतुलित व्यक्तिविकासात, निकोप समाजधारणेत व त्याचा परिपाक म्हणजे राष्ट्रोन्नतीत शास्वत मूल्यांचे महत्व समजावून देणे ही शिक्षणाची त्रिविध उद्दिष्टे असावीत.

प्रा. एन.एम. सावंत यांनी " इ. १ ली ते ४ थी च्या भाषा, इतिहास व भूगोल या पाठ्यपुस्तकात प्रतिबिंबित झालेल्या मूल्यांचा चिकित्सक अभ्यास करणे व या वयोगटाच्या विद्यार्थ्यांवर कोणती मूल्ये बिंबवावीत यासंबंधी शिफारशी करणे "[३४] या विषयावर संशोधन केले आहे.

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे होती -

१) इयत्ता १ ते ४ च्या भाषा, इतिहास व भूगोल या पाठ्यपुस्तकांचा चिकित्सक अभ्यास करणे आणि पाठ्यपुस्तकात प्रतिबिंबित झालेल्या मूल्यांचा शोध घेणे.

२) इ. १ ते ४ वयोगटाच्या विद्यार्थ्यांवर कोणती मूल्ये बिंबवावीत याबाबत संबंधित वर्गांना शिकविणाऱ्या अध्यापकांच्या मतांचा शोध घेणे.

३) इयत्ता १ ते ४ मधील वयोगटाच्या विद्यार्थ्यांवर कोणती मूल्ये बिंबवावीत यासंबंधी शिफारशी करणे.

प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब केला गेला. संशोधनसामग्री गोळा करण्यासाठी प्रश्नावली व मुलाखत या साधनांचा वापर करण्यात आला.

या संशोधनाचे निष्कर्ष असे आहेत :

प्रस्तुत पाठयपुस्तकात विविध पाठांतील विषयात संस्काराच्या दृष्टीने विविधता आढळते.

धर्माचा व मूल्यांचा निकटचा संबंध आढळून येतो.

मूल्ये परिणामकारकरितीने बिंबविण्यासाठी अभ्यासक्रमात बदल करण्याची आवश्यकता वाटते.

इयत्ता १ ली ते ४ थीच्या भाषा विषयाच्या पाठयपुस्तकाद्वारे सत्य, समता, बंधुभाव, सहकार्य, एकता, प्रेमभाव, ऐक्य आदी चिरंतन मूल्ये बिंबविण्याचा प्रयत्न झालेला आहे.

इयत्ता ४ थीच्या इतिहासाच्या पाठयपुस्तकातून स्फूर्ती व प्रेरणा मिळतेच, त्याशिवाय शिवरायांची मातृभक्ती, पितृभक्ती, राष्ट्रभक्ती, मित्रप्रेम व धर्मनिष्ठा ही मूल्ये बिंबविण्याचा प्रयत्न चांगला केलेला आहे.

प्रस्तुत पाठयपुस्तके अहिंसावादी दृष्टिकोन निर्माण करत नाहीत व भ्रष्टाचाराचा उच्छेद करण्यासाठी झुंजण्याची प्रेरणात देत नाहीत.

प्रत्यक्ष कृती किंवा वर्तन केल्याशिवाय मनावर मूल्ये बिंबविली जाऊ शकत नाहीत. इतिहास, भूगोल या पाठ्यपुस्तकांमध्ये प्रत्यक्ष कृती करण्यास फारशी संधी उपलब्ध झालेली दिसत नाही.

भाषा, इतिहास व भूगोल या पाठ्यपुस्तकात ' लोकशाही एक जीवनपध्दती ' ही वृत्ती वृध्दिंगत होईल, अशी संधी प्राप्त झालेली नाही.

श्रमसंस्कार रुजविण्यासाठी श्रमनिष्ठा व श्रमप्रतिष्ठा ही मूल्ये वृध्दिंगत होण्यासाठी काही सुधारणा होणे गरजेचे आहे.

३.४ <u>समारोप</u> :

प्रास्ताविकात म्हटल्याप्रमाणे संशोधकाला प्रस्तुत प्रकरणात घेतलेला आढावा उपयुक्त ठरला. हा संपूर्ण आढावा घेतल्यानंतर आणखी एक गोष्ट स्पष्ट होते ती ही की, अद्यापि उच्च माध्यमिक स्तरावरील मराठीच्या पाठ्यपुस्तकातून प्रतिबिंबित होणाऱ्या मूल्यांच्या संक्रमणाच्या संदर्भात स्वतंत्रपणे संशोधन झालेले नाही. प्रस्तुत संशोधन हे म्हणूनच मूलगामी आणि नवीन ठरते.

संशोधनसमस्येशी संबंधित प्रकाशित, अप्रकाशित आणि संशोधित साहित्याच्या समालोचनानंतर पुढील प्रकरणात (प्रकरण क्रमांक ४ - इयत्ता ११ वी व १२ वीच्या मराठीच्या पाठ्यपुस्तकांचे मूल्यशिक्षणाच्या दृष्टीने विश्लेषण) उच्च माध्यमिक स्तरावरील मराठीच्या पाठ्यपुस्तकातून (' युवक भारती ' इयत्ता ११ वी, १२ वी) प्रतिबिंबित होणाऱ्या मूल्यांचे वर्गीकरण व विश्लेषण केलेले आहे.

<u>संदर्भ</u>

1. Whitney, F.L., <u>Elements of Research</u>, Prentice Hall Inc., N.Y., 1954, p. 112.

२. सोनवणे, का.पा. (संपादक), <u>नैतिक शिक्षण</u>, (पुणे : शिक्षणशास्त्र संस्था), १९८५.

३) छापेकर, ल.नी., <u>असे होतात संस्कार</u>, (नागपूर : मंगल प्रकाशन), १९८१.

४) जोशी, अ.स., <u>नैतिक आध्यात्मिक शिक्षण : समस्यांची समस्या</u>, (औरंगाबाद : परिमल प्रकाशन,) पुनर्मुद्रण, फेब्रुवारी १९८९.

५) सहस्त्रबुध्दे, दि.ह., <u>शिक्षणातून नैतिक मूल्यसंवर्धन</u>,(पुणे : साधना प्रकाशन,)प्र.आ., १९८४.

६) नाडकर्णी, म.द., <u>शिक्षणाच्या वास्तव दिशा</u>, मुंबई : ललित नाटय प्रकाशन) १९८७.

७) भगत, रा.तु. (संपादक), <u>आजच्या शिक्षणातील विचार प्रवाह</u>, कोल्हापूर : चैतन्य प्रकाशन, १९८२.

८) देवस्थळी, रा.मा., <u>विद्यार्थी मित्रांनो</u>,(कोल्हापूर : सन्मित्र प्रकाशन,) प्र.आ. १९८९, पृ. १०.

९) चौधरी, मधुकरराव, <u>शिक्षण विचार</u>,(मुंबई : सिंधू पब्लिकेशान्स,) १९७०, पृ. ७२ ते ७७.

१०) पाटील, लीला (संपादक), <u>मूल्यशिक्षण</u>,(श्री. महाराणी ताराबाई अध्यापक महाविद्यालय, सुवर्णमहोत्सवी विशेषांक, कोल्हापूर,) १९८५.

११) कुलकर्णी, श.शं., <u>उद्याचे शिक्षण व शिक्षकांशी हितगुज</u>, (नागपूर : शिक्षण समीक्षा,प्रकाशन,) १९८८, पृ. १७ ते २४.

१२) रेगे, शि.द. (संपादक) <u>शैक्षणिक विचार दर्शन</u>,(मुंबई : बालमोहन विद्यामंदिर रौप्य महोत्सवी प्रकाशन,) १९६७, पृ. ४१ ते ५२ व ७५ ते ७९.

१३) Goyal, B.R., Documents on Social, Moral and Spiritual Values in Education,(New Delhi : N.C.E.R.T.,) 1979.

१४) सहस्त्रबुध्दे, दि.ह., पाठ अध्यापनातून मूल्यसंवर्धन, शिक्षण आणि समाज, (त्रैमासिक) (संपादक, डॉ. चित्रा नाईक प्रकाशक अ.वि. गाडगीळ) (पुणे : ईंडियन इन्स्टिटयुट ऑफ एज्युकेशन) एप्रिल-जून, १९८४, पृ. २४१ ते २४४.

१५) डोंगरे ग.शं., नैतिक शिक्षणाचा प्रकल्प - संकल्पना व कार्यवाही, शिक्षण आणि समाज,(पुणे : ईंडियन इन्स्टिटयुट ऑफ एज्युकेशन,) एप्रिल-जून १९८४, पृ. १८२ ते १८५.

१६) रेगे, मे.पु., मूल्यांचे शिक्षण, शिक्षण आणि समाज,(पुणे : ईंडियन इस्न्टिटयुट ऑफ एज्युकेशन,) जुलै-सप्टेंबर, १९८१, पृ. १९० ते ३०२.

१७) गाडगीळ अ.वि., मूल्य शिक्षण, शिक्षण आणि समाज,(पुणे : ईंडियन इन्स्टिटयुट ऑफ एज्युकेशन,) जानेवारी-मार्च, १९८५, पृ. १४१ ते १४३.

१८) गोटखिंडीकर, दि.कृ., नैतिक शिक्षणाविषयी माझ्या कल्पना, भारतीय शिक्षण, (मुंबई - विलेपार्ले पूर्व, संपादक भारतीय शिक्षण) (मासिक), मे-जून १९८६, पृ. १५६ ते १६०.

१९) रानडे, ल.ह., शाश्वत मूल्यांची जोपासना, भारतीय शिक्षण (मुंबई विलेपार्ले पूर्व, संपादक, भारतीय शिक्षण) (मासिक) ऑगस्ट १९८२, पृ. २४८ ते २५१.

२०) पोतदार, आर.पी., नैतिक शिक्षण - काल, आज आणि उद्या, भारतीय शिक्षण, ऑगस्ट, १९८४, पृ. ११३ ते ११७.

21) Ehsanul Haq, Education and Political Modernization : An Analysis of School Text-Books in Delhi, N.I.E. Journal, May, 1973 8(5) 19-25.

22) Gore, M.S. et. al., Field Studies in the Sociology of Education, New Delhi, N.C.E.R.T., 1970.

23) Choudhari, U.S. and Sharma, B.N., A Comparative Study of Values Reflected in National and State Level Hindi Text-Books, Dissertation, Indore University of Indore, 1974, Quest in Education, Vol. XIX, No. 3, July, 1982, pp. 256-258.

24) Choudhari, U.S., An Evaluation of Nationalized Hindi Text-Books of Madhya Pradesh, Ph.D. Thesis, Indore : University of Indore, 1975, Quest in Education, Vol.XIX, No.3, July, 1982, pp. 256-258.

25) Keasey, C.M., Ph Experimentally Induced Change in Moral Opinions and Reasoning, Journal of Personality and Social Psychology, 26, 30-38, 1973.

26) Moir, D.J., Egocentrism and Emergence of Conventional Morality in Preadolescent Girls, Child Development, 45, 299-304, 1974.

27) Ries, Steven I., Harward University, An Empirical Study of an Educational Intervention Curriculum and its Facilitative Effect upon Moral Development, Abstract, International Vol. 44, 1984, p. 22.

28) Garrold, Andrew Carruthers, Ph.D. Harward University, A Developmental Approach to the Teaching of Literature, A Context for Moral and Ego Growth Adolescents, Dissertation, Abstract, International, Vol. 45, 1984, p. 25.

29) Harvey, Patricia, Lawson, Ph.D. University of Maryland, Moral Development and Residence, Hall Vantalism, Dissertation Abstract, International, Vol. 44, 1984, p. 32.

30) Bailey, Deborah Ann., Ph.D. University of Missouri Columbia, The Relationship Between Stages of Moral Judgement and Elementary Class-room Teacher's Perceptions of Distrubing Behaviour, Dissertation Abstract, International, Vol. 46, 1986, p. 23.

३१) बन्सी पंडित, शिक्षण समीक्षा - एप्रिल-मे, १९८६, नैतिक शिक्षणाचे विविध पैलू - एक प्रयोगात्मक अभ्यास, पृ. १८८.

३२) सावंत, एम्.एन्., भारतीय शिक्षण, जुलै, १९८९, पाठ्यपुस्तकात प्रतिबिंबित झालेल्या मूल्यांचा अभ्यास, अनुक्रम १८, पृ. २६९.